


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे  सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ । अंक १५६ । शुक्रवार ६ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी शहर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

### कायदेशीर कारवाईचा इशारा । ३७ जणांना नोटीसा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आदींना डीजे डॉल्बीच्या कर्कश्य व असह्य अशा आवाजामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाकडून संबंधितांना वारंवार सूचना देण्यात येतात. परंतु या सूचनांकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. त्यामुळे अशा प्रकारचे ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी शहर विभाग पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून शाळा, कॉलेजेस, हॉस्पिटल, धार्मिक स्थळे इत्यादी परिसरामध्ये कर्कश डीजे डॉल्बीचा आवाज करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या विरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ त्याचबरोबर ध्वनी प्रदूषण (विनिमय व नियंत्रण ) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिला आहे.

या संदर्भात शहरातील ३७ डीजे / डॉल्बी चालक-मालक, मंगल कार्यालयांचे मालक, जनरेटर वाहन मालक यांना भारतीय दंड संहिता कलम १६८ प्रमाणे नोटीसा बजावण्यात आल्या असल्याचे देखील डॉ. टिपरसे यांनी सांगितले.

शहर परिसरामध्ये कोठेही अशा प्रकारे ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन करून डीजे व डॉल्बी सिस्टीमद्वारे कर्कश्य व असह्य आवाज करीत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आवाहन डॉ. टिपरसे यांनी केले आहे.

## दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा; शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

### २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर । वीजबिल माफीसाठी २० हजार कोटींची तरतूद । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**मुंबई । वृत्तसंस्था–** राज्याच्या अर्थकारणाचा वेध घेणारा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत सादर केला. या अर्थसंकल्पात शेती आणि शेतकरी वर्गाला केंद्रस्थानी ठेवत अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या. विशेषतः कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली आहे.

राज्याच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्पित करत हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. राज्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे हा या अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

लाखो शेतकऱ्यांना दिलासा

अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा म्हणजे शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत प्रलंबित असलेल्या पीककर्जासाठी शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीसाठी पात्र ठरणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. ■ पान ४ वर



## भिंगार येथे गोमांस विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथे गोवंश जनावरांची कत्तल करुन विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई करण्यात आली आहे.त्यांच्याकडून ८ हजार रुपये किमतीचे गोमांस जप्त करण्यात आले आहे.

सोहेल इकबाल कुरेशी (वय २५, रा. सदरबाजार), जुनेद कुरेशी (रा. झेंडीगेट, अहिल्यानगर) अशी कारवाई करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघे भिंगार येथील सदर बाजारजवळील पाटोळे यांच्या घराजवळ गोवंश जनावरांची कत्तल करुन मांसची विक्री करत असल्याची माहिती पोलिस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तात्काळ हेमंत खंडागळे, सागर द्वारके, महेश मगर, भारत बुधवंत यांना कारवाई करण्याच्या सुचना केल्या त्यानुसार पोलिसांनी तात्काळ छापा टाकून कारवाई केली. त्यांच्याकडून ८ हजार रुपये किमतीचे गोमांस जप्त करण्यात आले आहे.

## मोबाईल फुटल्याच्या वादातून प्राणघातक हल्ला

### ११ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मोबाईल फुटल्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर प्राणघातक हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना केडगावसोनेवाडी रोडवरील निशा इन्फ्रास्ट्रक्चरच्या आरएमसी प्लँटमध्ये घडली. या घटनेत झारखंडमधील परप्रांतीय कामगार शाबीर अन्सारी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर नगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी



नगर तालुका पोलीस ठाण्यात ११ जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जखमीचा सहकारी जहागीर हलीम अन्सारी (मूळ रा. झारखंड, सध्या रा. सोनेवाडी, ता. नगर) यांनी ५ मार्च रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि जखमी शाबीर अन्सारी हे दोघेही निशा इन्फ्रास्ट्रक्चरच्या आरएमसी प्लँटमध्ये कामगार म्हणून कार्यरत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ मार्च रोजी सकाळी शाबीर अन्सारी याने त्याचा मोबाईल जेसीबी मशीनवर ठेवला होता. त्या वेळी ■ पान ४ वर

## अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

### छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमाचा इतिहास तरुणांना प्रेरणादायी – सचिन जगताप




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य केले. स्वराज्य निर्माण केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमाचा इतिहास हा तरुणांना प्रेरणा देणारा आहे.अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे कार्य कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांनी केले.

ताठे मळा येथील महालक्ष्मी गार्डन येथे अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी माजी उपमहापौर अनिल बोरुडे,माजी नगरसेवक दगडू मामा पवार,विलास ताठे,स्विकृत नगरसेवक रेवणनाथ पवार,अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे,फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दिपक खेडकर ,सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, ■ पान ४ वर

## नेवासा पोलीस ठाण्याची चौकशी?

### पोलीस वर्तुळातच दबकी चर्चा : व्यावसायिक स्वरुप पाहून वरीष्ठांचा संताप

**दैनिक आकर्षण । कमलेश गायकवाड**

**नेवासा फाटा –** एखाद्या खाजगी सुरक्षा एजन्सीसारखा कारभार सुरु असल्याच्या सातत्यपूर्ण आरोपांमुळे नेवासा पोलीस ठाण्याच्या कारभाराची वरीष्ठ पातळीवरुन सलग दोन-तीन वेळा विशेष तपासणी व चौकशी करण्यात आल्याची रंगतदार चर्चा पोलीस वर्तुळातूनच ऐकावयास मिळत आहे. या चौकशांमुळे गेल्या काही महिन्यांपासून या पोलीस ठाण्यात सुरु असलेल्या हम करे सो कायदा या वृत्तीला चाप लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नेवासा पोलीस ठाण्याचा कारभार गेल्या काही महिन्यांत कळीचा मुद्दा बनले आहे. या पोलीस ठाण्यात सुरु असलेल्या आतबट्ट्याच्या कारभाराची उलट-सुलट चर्चा तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्याच्या पोलीस वर्तुळात झडत होती. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना अक्षरशः कर्तव्याचा विसर पडला की काय? असा प्रश्न उपस्थित करण्यासारखी चिंताजनक परिस्थिती दिसून येत होती. राजरोस सुरु असलेली वाळू, रेशन. गौण खनिज तस्करी तसेच मटका, दारु, बिंगो, सारखे मोठा साईड इनकमचा स्त्रोत समजले जाणारे समाज व्यवस्थेला घातक धंदे तालुक्यातील कायदा-सुव्यवस्थेचा काळ बनू पाहत असल्याचे वास्तव आहे.

यातून चांगलीच घसघशीत कमाई होत असल्याने या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने कर्तव्याला सपशेल फाट्यावर मारुन या अवैध धंद्यांच्या संगोपनावर संपूर्ण लक्ष केंद्रीत केल्याचे बोलले जात आहे. इतके की, या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध गुन्ह्यांची उकल करण्यासाठी जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे अन्वेषण सारख्या यंत्रणांना कारवाई करण्याची वेळ ओढवल्याचे वास्तव दिसून आले. गुन्हेगारीचा वाढता आलेख दिसून येऊ नये म्हणून या पोलीस ठाण्याच्या कारभाऱ्यांनी नामी शक्कल लढवत तक्रारींची नोंद होऊ न देण्याची खबरदारी घेतल्याचे सांगण्यात येते. पॉस्को सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीवर गुन्हा नोंदल्याला ■ पान ४ वर

### कामगारांच्या ८६ लाख थकीत वेतनासाठी

## संत एकनाथ साखर कारखान्याची दोन गोडाऊन सील

### न्यायालयाच्या आदेशानंतर महसूल विभागाची कारवाई; साखरेचा साठा ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** संत एकनाथ साखर कारखान्यातील १८ कामगारांचे ८६ लाख ४० हजार ४७३ रुपये थकीत वेतन न दिल्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार महसूल प्रशासनाने कारखान्यावर कारवाई करत साखरेची दोन गोडाऊन सील केली. ही कारवाई गुरुवारी करण्यात आली.

कंपनीने थकीत रक्कम जमा न केल्याने तहसीलदार ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने कारखाना परिसरात जाऊन कारवाई केली. यावेळी नायब तहसीलदार राहुल बनसोडे, मंडळ अधिकारी सीमा भोसले तसेच अधिकारी कल्पना पोखळे, रविंद्र जोशी, रमेश सोनवणे, गिरीश चोडपळ, अनिल गिरी, रविंद्र सोनटक्के, अनिल घोडके आदी उपस्थित होते.



महसूल पथकाने कारखान्यातील साखरेच्या दोन गोडाऊनवर सील लावून साठा ताब्यात घेतला. दरम्यान, ही कारवाई काही काळ गुप्त ठेवण्यात आल्याची चर्चा होती. संबंधित पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

अखेरीस तहसीलदार ज्योती पवार यांनी कारवाई झाल्याची माहिती दिली. मात्र सील करण्यात आलेल्या दोन गोडाऊनमध्ये असलेल्या साखरेच्या पोत्यांचा व इतर मालमत्तेचा तपशील उशिरापर्यंत स्पष्ट होऊ शकला नव्हता.

## शहरातील प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेत ठामपणे आवाज उठवा – आमदार संग्राम जगताप

### राष्ट्रवादी-भाजप युतीच्या स्वीकृत नगरसेवकांचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार । विकी जगताप, रवींद्र बारस्कर, बाबुशेठ नागरगोजे व रेवनाथ पवार यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीच्या वतीने स्वीकृत नगरसेवक म्हणून विकी जगताप, रवींद्र बारस्कर, बाबुशेठ नागरगोजे आणि रेवनाथ पवार यांची निवड करण्यात आली. यानिमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते या नव्या स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी नव्या नगरसेवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वीकृत नगरसेवकांनी शहरातील विविध प्रश्न समजून घेऊन ते सोडवण्यासाठी महापालिकेत ठामपणे आवाज उठवला पाहिजे. नगरसेवक हे जनतेच्या सेवेसाठी असतात. त्यामुळे या पदाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी केला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

पुढे ते म्हणाले की, शहरातील सामाजिक संस्था, इंजिनिअर, डॉक्टर, आध्यात्मिक व धार्मिक संस्था तसेच सांस्कृतिक आणि नाट्य चळवळीशी संपर्क ठेवून शहरातील विविध प्रश्न जाणून घेणे गरजेचे आहे. सर्व



घटकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या तर त्या सोडवणे सोपे जाईल. नव्या नगरसेवकांच्या माध्यमातून नगरकरांच्या सेवेसाठी चांगले काम घडावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती तथा नगरसेवक अविनाश घुले, माजी नगरसेवक दगडू मामा पवार तसेच विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, नूतन स्वीकृत नगरसेवकांनी यावेळी आपली भावना व्यक्त करताना सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भाजप युतीच्या वतीने आमच्यावर सोपवण्यात आलेली नगरसेवक पदाची जबाबदारी आम्ही प्रामाणिकपणे पार पाडू. शहरातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करून नगरकरांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले.

## दै. आकर्षण निवडक

### शहापूरमध्ये हनुमान चालीसा पठणाचा भव्य सोहळा



अहिल्यानगर- शहापूर गावातील शिव दत्त महाराज यांच्या पुढाकारातून शहापूर येथे हनुमान चालीसा पठणाचा कार्यक्रम अत्यंत भक्तीभावाने आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बजरंगबलींच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक हनुमान चालीसा पठण करण्यात आले. उपस्थित भाविकांनी एकसुरात हनुमान चालीसा म्हणत प्रभू श्रीरामांचे परमभक्त भगवान हनुमान यांची भक्तीभावाने आराधना केली. जयघोष, मंत्रोच्चार आणि भक्तिगीतांमुळे परिसरात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली होती. या कार्यक्रमाचे आयोजन शिवभक्त ज्ञानदेव काळे पाटील, पै हेमराज भैय्या भालसिंग पाटील यांच्या सौजन्यातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विष्णू तरुण मंडळ, शिवशक्ती तरुण मंडळ, बजरंग बली मित्र मंडळ शंभू राजे मित्र मंडळ तसेच मंगलेश्वर मित्र मंडळ पदाधिकाऱ्यांनी आणि शहापूर ग्रामस्थ उपस्थित होते हनुमान चालीसा पठणाच्या माध्यमातून समाजात एकोपा, श्रद्धा आणि आध्यात्मिक संस्कार दृढ व्हावेत, हा या कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. गावातील तरुणांनी पुढाकार घेत धार्मिक परंपरा जपण्याचा प्रयत्न केल्याने ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी शहापूर गावातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले. या भक्तिमय सोहळ्यामुळे शहापूर गावात धार्मिक उत्साहाचे आणि सामाजिक ऐक्याचे सुंदर चित्र पाहायला मिळाले.

### सावेडी येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त संत संमेलन

अहिल्यानगर - गौरव महानुभावांचा संकल्प पर्यावरण संवर्धनाचा या उद्गारांनी गुंजलेलं सावेडी गाव, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या बीज उत्सवानिमित्त झालेल्या संत संमेलनाने भक्तिभाव आणि सामाजिक जागृतीच्या रंगात न्हाऊन निघालं. श्री जगद्गुरू तुकाराम महाराज प्रतिष्ठान आयोजित या संत संमेलनाचे आयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या शुभ प्रेरणेने करण्यात आले होते. कार्यक्रमात विविध संत-महंत, समाजप्रबोधन करणारे वक्ते, आणि वारकरी संप्रदायातील संतमहात्म्यांचा गौरव करण्यात आला. संत विचार आणि पर्यावरण संवर्धन या विषयावर बोलताना ह. भ. प. संदीप महाराज खोसे म्हणाले की, जगाच्या कल्याणासाठी संतांनी देह कष्टवून परोपकार साधला. तुकोबारायांच्या अभंगात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' ही शिकवण आजही तितकीच प्रासंगिक आहे. एक वृक्ष म्हणजे एक देवालय आहे. वृक्ष, नदी आणि निसर्गाचे उपकार आपण विसरलो, म्हणूनच पर्यावरणाचा ऱ्हास होतोय. ते पुढे म्हणाले, वृक्ष घाण खाऊन फळ देतात, पण मानव चांगलं खाऊन घाण बाहेर टाकतो. हीच आपली चूक आहे. आज पाणी विकत घ्यावं लागतं, पुढे ऑक्सिजन विकत घ्यावा लागेल, म्हणूनच आत्ताच सावधान होणं गरजेचं आहे. प्रत्येकाने एक तरी झाड लावावं आणि त्याचं संगोपन करावं. निसर्गाचं संवर्धन हीच पुढच्या पिढीसाठीची खरी संपत्ती आहे. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीचा संदर्भ देत सांगितलं की, संत विचार म्हणजे समाज प्रबोधनाची दिशा आहे. संतांनी कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केलेलं कार्य आपल्याला प्रेरणा देणारं आहे. आता गरज आहे ती त्या विचारांना कृतीत आणण्याची. ह. भ. प. विद्याताई हारदे यांनी आपल्या भाषणात सांगितलं की, महानगरांमधील प्रदूषित हवा नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करतेय. पर्यावरण शुद्धीकरणासाठी वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन आवश्यक आहे. शहरात जागा नसली तरी घरासमोर किंवा टेरेसवर तुळस आणि आयुर्वेदिक झाडं लावावीत.

# नवनागापूर येथे युवा सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात

**| युवकांसह एमआयडीसीतील कामगारांचा मोठा सहभाग | आरती व जयघोषात परिसर दुमदुमला**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवनागापूर येथील गजानन कॉलनी परिसरात युवा सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात नवनागापूर परिसरातील ग्रामस्थ, युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच एमआयडीसीमधील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिवजयंतीनिमित्त नवनागापूर चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली. यावेळी ''जय भवानी, जय शिवाजी'' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमास युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, दत्ता पाटील सप्रे, आकाश कातोरे, उपसरपंच नरेश शेळके, बाबासाहेब डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य उमेश पाटील डोंगरे, दीपक गीते, लखन बैरागी, रंगनाथ गव्हाणे, सुभाष दांगट, संतोष गवारे, शंकर शेळके, विशाल चव्हाण, अक्षय पिसे, कल्याण जाधव, स्वप्निल भरड, सुनिल शेवाळे, अरबाज खान, गौरव पाटोळे, अमोल घुटे, गोरव पाटोळे, ग्रामपंचायत सदस्य गोरक्ष गव्हाणे, स्वप्निल खराडे, वसीम शेख, संतोष शेवाळे, अभिजित सांबारे, प्रदीप दहातोंडे,



अजिनाथ शिरसाट, जितेंद्र तळेकर, शशीकांत संसारे, राहुल जगधने, राजेंद्र पारखे, नामदेव झेंडे, किसन तरटे, सचिन खेसे, संजय बागल, शिवाजी चौरे, शत्रुघ्न तांबे, अनिल गायकवाड, रामनाथ घुगे, प्रविण सोनवणे, सिद्धीनाथ पोकळे, अनिल शिरसाठ, भरत दिंडे, राहुल मेहेरखांब, गोरक्षनाथ खंडागळे, वैष्णव गलांडे, शिव गलांडे, अविनाश कर्डिले, नितीन खेसे, तुषार शेवाळे, निलेश शेवाळे, विष्णु घुगे, रामदास खरात, पवन क्षीरसागर, सागर पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सरपंच डॉ. बबनराव डोंगरे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि युवकांना योग्य दिशा देण्यासाठी शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना सर्व समाजघटकांना न्याय देणारे आदर्श राज्य उभारले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन नवनागापूरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जतन करण्यासाठी नवनागापूर येथे भव्य शिवस्मारक व शिवस्तंभ उभारण्याचा संकल्प ग्रामस्थांच्या सहकार्याने पूर्ण केला जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे यांनी सांगितले की, दरवर्षी युवा सेना आणि एमआयडीसीमधील कामगारांच्या सहभागातून नवनागापूर येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या शौर्य, धैर्य आणि दूरदृष्टीच्या बळावर अशक्य वाटणारे स्वराज्याचे स्वप्न साकार केले. त्यांनी स्वराज्यातील सर्व प्रजेला समान न्याय देत आदर्श प्रशासन उभे केले. आजच्या तरुणांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम या गुणांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी काम केले पाहिजे. देशभक्ती, शिस्त आणि समाजसेवेची भावना जपणे हीच शिवरायांना खरी अभिवादन ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

## बनावट खत–कीटकनाशक बनविणाऱ्यांवर कारवाई करा – आमदार काशिनाथ दाते सर



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**या कारवाईत विविध नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट पिशव्यांमध्ये खते भरून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले, संबंधित साठा जप्त करण्यात आला असून या प्रकरणी संबंधित संस्था, पुरवठादार आणि मालकांविरोधात कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, खते नियंत्रण आदेश १९८५ तसेच आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे.**

**ना. दत्ता मामा भरणे,**
**कृषीमंत्री**

**पारनेर–** शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने आग्रही भूमिका मांडत असलेल्या पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी काल पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न थेट विधानसभेत मांडत सातारा जिल्ह्यातील बनावट रासायनिक खते व कीटकनाशके तयार करणाऱ्या कारखान्यांच्या प्रकरणावर सरकारचे लक्ष वेधले. सध्या सुरू असलेल्या २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी हा प्रश्न उपस्थित करत शासनाकडून सविस्तर माहिती मागवली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रकारांवर कठोर कारवाई व्हावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी यावेळी केली. आमदार दाते सरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित विभागाचे मंत्री नामदार दत्तामामा भरणे यांनी सांगितले की, सातारा जिल्ह्यातील वडूज (ता. खटाव) परिसरात कृषी विभाग व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या संयुक्त कारवाईत बनावट रासायनिक खते व कीटकनाशके जप्त करण्यात आली आहेत. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणावर बनावट खतांची साठवण आढळून आली असून त्याची किंमत लाखो रुपयांमध्ये असल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय जिल्हास्तरीय भरारी पथक आणि कृषी विभागाने संयुक्त तपास सुरू ठेवला असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली जात असल्याचे शासनाने स्पष्ट केले. दरम्यान, शेतकऱ्यांना निकृष्ट व बनावट खतांपासून संरक्षण मिळावे, यासाठी अशा प्रकरणांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उत्पादनाच्या सुरक्षिततेसाठी शासनाने अधिक सतर्कता बाळगावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी विधानसभेत केली.

## मढी मार्गे मायांबा बसफेऱ्या सुरू; नाथभक्तांची गैरसोय दूर

**आमदार मोनिकाताई राजळे आदेशानंतर आगर प्रमुखांची कार्यवाही**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगाव आगारातून शेवगाव, तिसगाव, मढी, घाटशिरस, वृद्धेश्वर, मायांबा या तीर्थक्षेत्रांच्या मार्गावर दिनांक ५ मार्च २०२६ पासून एसटी बसच्या दोन फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. या बससेवेच्या माध्यमातून श्री क्षेत्र मढी, आदिनाथ वृद्धेश्वर व मायांबा येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची मोठी सोय झाली आहे.



नवीन वेळापत्रकानुसार सकाळी ८.३० वाजता बस शेवगाव येथून सुटून सकाळी ९.१५ वाजता श्री क्षेत्र मढी येथे पोहोचणार आहे. त्यानंतर मायांबा येथून सकाळी १०.४५ वाजता बस सुटून दुपारी १२.०० वाजता श्री क्षेत्र मढी येथे पोहोचेल.

तसेच संध्याकाळी ५.३० वाजता दुसरी फेरी शेवगाव येथून सुटून सायंकाळी ६.१५ वाजता श्री क्षेत्र मढी येथे पोहोचेल. तर दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१५ वाजता मायांबा येथून बस सुटून सकाळी ७.३० वाजता श्री क्षेत्र मढी येथे येईल.

या बससेवेच्या माध्यमातून भाविकांना आदिनाथ वृद्धेश्वर, श्री क्षेत्र मढी येथील श्री चैतन्य कानिफनाथ महाराज संजीवन समाधी तसेच मायांबा येथील श्री मच्छिंद्रनाथ महाराज संजीवन समाधीचे दर्शन घेणे कमी वाहन सेवा उपलब्ध झाल्याने भाविकांचा या तीर्थक्षेत्र मार्गावरील प्रवास अधिक सुलभ होणार आहे. या मार्गावर बससेवा सुरू करण्याबाबत आमदार मोनिकाताई राजळे यांनी शेवगाव आगार प्रमुखांना आदेश देऊन आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे ही बससेवा सुरू झाल्याने शेवगाव तालुक्यातील तसेच या मार्गावर येणाऱ्या पाथर्डी तालुक्यातील गावामधील भाविकांची प्रवासाची मोठी गैरसोय दूर झाली आहे.

आज सकाळी सदर बसचे मढी येथे आगमन झाल्यावर, श्री.कानिफनाथ देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठल मरकड, विश्वस्त उत्तमराव मरकड, विश्वस्त मदन मरकड, देवस्थान कार्यकारी अधिकारी अशोक पवार यांच्यासह कर्मचारी, गावकरी व नाथभक्तांनी बसला हार घालून जोरदार स्वागत करुन नारळ फोडून पूजन केले.

बस फेऱ्यांचे वेळापत्रक :

- ❋ सकाळी ८.३० शेवगाव येथून प्रस्थान
- ❋ सकाळी ९.१५ श्री क्षेत्र मढी आगमन
- ❋ सकाळी १०.४५ मायांबा येथून प्रस्थान
- ❋ दुपारी १२.०० श्री क्षेत्र मढी आगमन
- ❋ सायं. ५.३० शेवगाव येथून दुसरी फेरी
- ❋ सायं. ६.१५ श्री क्षेत्र मढी आगमन
- ❋ दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१५ मायांबा येथून प्रस्थान
- ❋ सकाळी ७.३० श्री क्षेत्र मढी आगमन

## अहिल्यानगरमधील ३ लाखांहून अधिक नागरिकांसाठी कॅन्सर केअर उपक्रम, लवकर निदान आणि उपचारांवर भर

**इंडियन कॅन्सर सोसायटी, अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात कर्करोग जागरूकता आणि तपासणी मोहिमेचे आयोजन**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस), अल्केम फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा आरोग्य विभाग यांनी एकत्रितरित्या सतर्क हा समुदाय-केंद्रित प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरी या तालुक्यांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती करणे आणि संगमनेर तालुक्यात विशेष तपासणी मोहीम राबवणे हा आहे.

या सर्वसमावेशक कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आशा कार्यकर्त्यांसह इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, जेणेकरून ते जिल्हाभर कर्करोगाबद्दल जनजागृती करू शकतील. यासोबतच संगमनेर तालुक्यात मुखाच्या, स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी विनामूल्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. या तीन प्रकारच्या कर्करोगांनी ग्रस्त रुग्णांची संख्या ही सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळेच, स्क्रिनिंगच्या माध्यमातून या आजारांचे वेळीच निदान करणे अत्यंत आवश्यक आहे. कर्करोगपूर्व लक्षणे आणि कर्करोगाचे निदान प्राथमिक पातळीवरच झाल्यास मृत्यूचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे आणि रुग्णांच्या उपचारांवरील वाढता खर्चही वाचवणे शक्य आहे.

केवळ उपचारच नाही, तर कॅन्सरबद्दल समाजात असलेली भीती आणि चुकीचे समज दूर करणे हे या कार्यक्रमाचे महत्त्वाचे ध्येय आहे. याशिवाय, शाळा आणि कॉलेजमधील मुला-मुलींसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील. यामुळे नवीन पिढी आरोग्याबाबत अधिक जागरूक होईल आणि भविष्यात एक निरोगी समाज घडवण्यास मदत होईल.

हा कार्यक्रम सरकारी प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी आखला आहे. विशेषतः गरीब आणि गरजू लोकांसाठी हे वरदान ठरणार आहे. संगमनेर, अकोला, पारनेर आणि राहुरीमध्ये विविध माध्यमांतून ३ लाखांहून अधिक लोकांपर्यंत आरोग्य संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत एकूण ४५ तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, ज्यामध्ये ३,१५० लोकांची प्रत्यक्ष वैद्यकीय तपासणी केली जाईल आणि १ लाख लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाईल. ही तपासणी एचपीव्ही, डीएनए सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत एसएमबीटी रुग्णालयाचे मोठे सहकार्य लाभणार आहे.

श्रीमती उषा थोरात (नॅशनल मॅनेजिंग ट्रस्टी, इंडियन कॅन्सर सोसायटी) यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना म्हटले की, ''कॅन्सरविरुद्धच्या लढाईत अल्केम फाऊंडेशनसोबतची ही भागीदारी अत्यंत मोलाची आहे. कॅन्सरची लक्षणे, त्यामागील कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांची पुरेशी माहिती असणे, हीच या आजारावर मात करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. लोकांकडे योग्य माहिती असेल, तरच ते स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होतील. आपण सर्वांनी मिळून अशा भविष्यासाठी प्रयत्न करूया जिथे कॅन्सरचे निदान वेळीच होईल, प्रभावी उपचार मिळतील आणि रुग्ण या आजारातून पूर्णपणे सावरून सुदृढ आयुष्य जगू शकतील.''

अल्केम फाऊंडेशनच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ''आमचा हा कॅन्सर केअर कार्यक्रम तळागाळातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये इंडियन कॅन्सर सोसायटीसोबत काम करताना अशा दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे,

## कोळगाव थडी येथे श्री मोठे बाबा (मच्छिंद्रनाथ) यात्रा उत्साहात



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**कोपरगाव–** कोपरगाव तालुक्यातील कोळगाव थडी येथे श्री मोठे बाबा (मच्छिंद्रनाथ) यांची वार्षिक यात्रा यंदा मोठ्या थाटामाटात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. दोन दिवस चाललेल्या या यात्रेत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसरात उत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले.यात्रेनिमित्त सकाळच्या सत्रात पारंपरिक कावड मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. ग्रामस्थ व भाविकांनी मोठ्या श्रद्धेने कावडीचा आनंद घेत मिरवणुकीत सहभाग नोंदवला. या प्रसंगी कोपरगाव तालुक्याचे विद्यमान आमदार आशुतोष दादा काळे यांनीही उपस्थित राहून कावडीचा आनंद घेतला. त्यांनी श्री मोठे बाबा (मच्छिंद्रनाथ) यांचे मनोभावे दर्शन घेऊन ग्रामस्थांना यात्रेच्या शुभेच्छा दिल्या.तसेच यात्रेदरम्यान श्री मोठे बाबा यांचा संदल सोहळा शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संध्याकाळच्या सत्रात श्री मोठे बाबा (मच्छिंद्रनाथ) यांची रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व भक्तांच्या जयघोषात ही मिरवणूक गावातून फिरविण्यात आली. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.यात्रेच्या दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध लोकनाट्य कलाकार सौ. सविता राणी पुणेकर यांच्या लोकनाट्य तमाशाने उपस्थित प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह परिसरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली.यात्रा शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी कोपरगाव पोलीस विभागाचे विशेष सहकार्य लाभले. त्याबद्दल श्री मोठे बाबा यात्रा कमिटीच्या वतीने पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानण्यात आले.तसेच कोळगाव थडी येथील सर्व ग्रामस्थांनी यात्रेसाठी वर्गणी देऊन व विविध प्रकारे सहकार्य करून यात्रा यशस्वी करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. त्याबद्दल श्री मोठे बाबा यात्रा कमिटीच्या वतीने सर्व ग्रामस्थांचे जाहीर आभार व्यक्त करण्यात आले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ❋संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सीए तृप्ती गांधी-बोरा यांचे घवघवीत यश



अहिल्यानगर- अथक प्रयत्न आणि जिद्दीच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सीए तृप्ती गांधी-बोरा यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या आयोजित सीए फायनल या अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या परीक्षेत त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. तृप्ती निलेश बोरा यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. या यशामध्ये प्रितेश लुंकड, सीए किरण भंडारी, सीए नीलम भंडारी, सीए समीर शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच श्रेयल श्रीजी महाराजसाहेब यांचे आशीर्वाद लाभले. त्यांच्या यशामागे बहीण ममता मुनोत, आधारस्तंभ वसंत मुनोत तसेच मित्रपरिवार रणजीत सुराणा, कविता भांबरे -घोलप, सीए दीपा घुले, सीए ऋषिकेश खोसे आणि सीए रवी आरसुळे यांची मोलाची साथ लाभली. दरम्यान, त्यांचा एकुलता एक मुलगा रोहन निलेश बोरा हाही सीए फायनल परीक्षेची तयारी करत असून त्यालाही त्या मार्गदर्शन करत आहेत.

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती सालाबादप्रमाणे भव्य मिरवणुकीने साजरी करणार - संभाजी कदम



अहिल्यानगर- हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार मिरवणुकीने साजरी करण्यात येणार आहे. सालाबादप्रमाणे पारंपारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांनी सजलेली ही मिरवणूक यंदाही नगरकरांसाठी विशेष आकर्षण ठरणार असल्याची माहिती शहर प्रमुख संभाजी कदम यांनी दिली. स्वर्गीय आमदार अनिल भैय्या राठोड यांनी तब्बल ४० वर्षांपूर्वी सुरू केलेली शिवजयंती मिरवणुकीची परंपरा आजही अविरत सुरू असून ती परंपरा शिवसेनेच्या माध्यमातून जतन केली जात आहे. या परंपरेला यंदाही भव्यतेची जोड देत नगर शहरात ऐतिहासिक आणि धार्मिक देखाव्यांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. मिरवणुकीत पारंपारिक वेशभूषा केलेले सनई-चौघडा पथक, घोडेस्वार मावळे यांचा दिमाखदार सहभाग असणार आहे. निमगाव वाघा येथील श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेचे शंभर वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात भक्तिमय वातावरण निर्माण करणार आहेत. विद्युत रोषणाईने सजविलेल्या भव्य रथावर छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आणि संभाजी महाराज यांचे जिवंत देखावे साकारले जाणार असून हे देखावे नगरकरांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहेत. तसेच सोलापूर येथील दीडशे कलाकारांचे पारंपारिक लेझीम डाव, प्रभू राम यांची १६ फुटी मूर्ती, महाकाली आघोरी इंदोर येथील कलाकारांचा भव्य पारंपरिक देखावा यामुळे मिरवणुकीत धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाची अनुभूती मिळणार आहे. नेवासा फाटा येथून सादर होणारी ६० फुटी लांबीची नवीन आणि वेगळी विद्युत रोषणाई हीदेखील यंदाची खास आकर्षण ठरणार आहे. त्याचप्रमाणे १५ फुटी आदियोगीची मूर्ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेणार आहे.संगमनेर येथील प्रसिद्ध ''वन्स मोर बँजो''चे पंचवीस कलाकारांचे पथक आपल्या मोहक सादरीकरणाने वातावरणात जल्लोष निर्माण करणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची १२ फुटी भव्य मूर्ती आणि विविध ऐतिहासिक, सामाजिक व धार्मिक देखावे मिरवणुकीची शोभा अधिक वाढवणार आहेत. नगर शहरातील प्रत्येक शिवप्रेमी, नागरिक, युवक-युवती तसेच कुटुंबियांनी या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी मिरवणुकीस उपस्थित राहून छत्रपतींच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन शहर प्रमुख संभाजी कदम यांनी केले आहे. नगरच्या सांस्कृतिक परंपरेचा आणि शिवभक्तीचा भव्य आविष्कार अनुभवण्यासाठी ही मिरवणूक अवश्य पाहावी, असेही त्यांनी नमूद केले.

# कर्जत तालुका दुधसंघास शीतकरण केंद्र जागेसह कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यासाठीच्या प्रस्तावाला मंत्रीमंडळाची मान्यता

## विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांच्या प्रयत्नांना यश | दुध उत्पादक शेतकरी बांधवांकडून निर्णयाचे स्वागत

**मुंबई | वृत्तसंस्था –** खाजगी दुध उत्पादकांच्या तीव्र स्पर्धेत सहकार महर्षी रावसाहेब ऊर्फ बाळासाहेब पाटील सहकारी दुध व्यवसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, कर्जत, जिल्हा अहिल्यानगर हा तालुका दुधसंघ गरीब, होतकरु शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम करीत आहे. दिनांक ११ नोव्हेंबर, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार इतर सहकारी दुध संघाच्या धर्तीवर कर्जत तालुका दुध संघास शीतकरण केंद्र जागेसह बाजारभावाच्या ५० टक्के दराने कायमस्वरुपी मालकी तत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव आज विधान भवन, मुंबई येथे झालेल्या मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आला. या मंत्रीमंडळ बैठकीत शासन शुध्दीपत्रक दि.२७/०६/२०२२ मधील (२) येथे नमूद नियम ७ (ब) मध्ये शिथिलता आणून सहकार महर्षी रावसाहेब तथा बाळासाहेब पाटील सहकारी दुध व्यवसायिक व प्रक्रिया संघ मर्या. कर्जत संघास शासकीय दुध शितकरण केंद्र, कर्जत येथील यंत्रसामुग्री, फर्निचर, वनसंपदा व इतर साहित्य यांची १००% रक्कम व जमिनीच्या सध्याच्या रेडी रेकनरनुसार येणाऱ्या किंमतीच्या ५०% रक्कम



संघाने भरून कर्जत शितकरण केंद्र कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यासाठी मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या पुढाकाराने यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात दुग्धविकास मंत्री मा.श्री.अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथील त्यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात दुग्धविकास मंत्री श्री.अतुल सावे यांनी हा विषय मंत्रीमंडळ बैठकीसमोर सादर करुन हस्तांतरण प्रक्रिया मंजूर केली जाईल, असे आश्वासित केले होते. आज दिनांक ०५ मार्च, २०२६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीसमोर हा विषय ठेवण्यात येऊन त्यास मंजूरी प्राप्त करण्यात आली आहे.

दुध शीतकरण केंद्र जागेसह कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्याची मागणी सन २०१८ मध्ये शासनाकडे करण्यात आली होती. या दुधसंघाची दुध संकलन क्षमता ११ हजार लिटर प्रतिदिन आहे. दुध उत्पादक शेतकऱ्यांना अधिकच्या सुविधा देता याव्यात यासाठी ही जागा संघास मालकी हक्काने मिळावी या दृष्टीने प्रयत्न सुरु होते. विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांच्या पुढाकाराने या प्रयत्नांना आता यश आले आहे. एकूण मुल्यांकन रुपये १,२७,०१,९२५/– रकमेस कर्जत दुधसंघ कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यासाठी अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार संघाने आतापर्यंत तीन हप्त्यांमध्ये रुपये ७६,२१,१५५/– इतकी रक्कम अदा केली असून उर्वरित रक्कम दोन हप्त्यामध्ये भरणे बाकी आहे.

दुधसंघाचे चेअरमन श्री.मंगेश जगताप, व्हा. चेअरमन श्री.दादासाहेब खराडे, श्री.काकासाहेब धांडे, श्री. रामजी पाटील, सरपंच श्री.विजय पोटरे, श्री.अनिल गदादे, दुधसंघाचे सचिव श्री.शेख यांनी तसेच कर्जत–जामखेड तालुक्यातील दुध उत्पादक संघांच्या प्रतिनिधिंनी आजच्या मंत्रीमंडळ बैठकीतील या निर्णयाचे स्वागत केले असून विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे तसेच मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस, उप मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे, उप मुख्यमंत्री मा.श्रीमती सुनेत्राताई पवार, दुग्धविकास मंत्री मा.श्री.अतुल सावे यांच्यासह महायुती सरकारला धन्यवाद दिले आहे.

## रहात्यातील कातनाल्यावर होणार जापनीज टेक्नॉंलॉंजीतून अप्परग्राऊंड बाजारतळ – डॉ सुजय विखे पाटील

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहाता शहरात जपानी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक 'अप्पर वॉटर' बाजारतळ उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत आहे. सुमारे ७ कोटी रुपये खर्चून आणि हायटेक बाजारतळ उभारला जाणार असून, असा प्रयोग महाराष्ट्रात प्रथमच होत असल्याची माहिती भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

राहात्यातील आठवडे बाजारचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून चर्चेत होता. हा बाजार विरभद्र मंदीरासमोरील मैदानात भरत असल्याने, पसिररातील शॉंपिंग कॉंम्प्लेक्समधील व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. शिवाय हे मैदान बाजारसाठी कमी पडत असल्याने शेतकरी व व्यापारी नगर–मनमाड महामार्ग व साकुरी रस्त्याच्या कडेला बसत होते.

त्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत होती. हिच समस्या सोडविण्यासाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉं. सुजय विखे पाटील यांनी पुढाकार घेतलाय. यावेळी कातनाल्याची स्वच्छता व इस्टीमेंट तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत कातनाल्यावर झालेल्या अतिक्रमणधारकांना नोटीसा देऊन कातनाला मोकळा करण्याचे काम तातडीने हाती घेण्यात येणार आहे.

गुरुवारी डॉं. सुजय विखे पाटील यांनी नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांसह स्वतः कातनाल्यात उतरत पाहणी केली. कातनाला अंडरग्राऊंड केल्यास त्यावर बाजारतळ विकसीत करता येईल, असा मानस त्यांनी बोलून दाखवला. कातनाल्यातील दुर्गंधीबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

मटण मार्केटमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटर () बसविण्याची योजना करण्यात आली आहे. या यंत्राद्वारे मटण मार्केटमधील जैविक कचरा जाळून नष्ट केला जाणार असल्यामुळे तो नाल्यात किंवा परिसरात साचणार नाही. त्यामुळे कचऱ्यामुळे होणारे पाणी प्रदूषण टाळण्यास मदत होणार असून परिसर स्वच्छ ठेवण्यासही मोठी मदत मिळणार आहे. जापनीज टेक्नॉंलॉंजीतून उभारण्यात येणारा हा हायटेक बाजारतळाचा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असणार आहे.

त्यासाठी तब्बल सात कोटी रुपये खर्च येणार आहे. याबाबत माहिती देताना डॉं. सुजय विखे पाटील म्हणाले की, राहाता शहराचा बाजार वर्षानुवर्षे विरभद्र मंदीरासमोर भरतो. परंतु या बाजारामुळे मंदीरातील भावीक व परिसरातील व्यावसायिकांना अडचण होते. शिवाय साकुरी व नगर–मनमाड रस्त्यावरील वाहनांनाही अडथळा येतो. जर कातनाला अंडरग्राऊंड केला, तर सुमारे एक ते दीड एकर जागा वापरायला मिळते. या कातनाल्याच्या पुराचे भविष्यातील ५० वर्षांचे नियोजन करुन आराखडा तयार केला जाणार आहे. जापनिज टेक्नॉंलॉंजीने कातनाला अंडरग्राऊंड करुन, त्यावर भव्य बाजारतळ उभारण्यात येणार आहे.

राहात्यातील मटन मार्केटचा कचराही कायमस्वरुपी नष्ट करण्याचा प्लॅन करण्यात येणार असून, सध्याचे मटन मार्केटला स्थलांतरीत करण्यात येईल, असेही डॉं. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. येत्या १ एप्रिलपासून या कामाला प्रारंभ करण्यात येईल व पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होईल, असा मानसही डॉं. विखे यांनी व्यक्त केला. यावेळी राहाता नगरपालिकेचे नगराध्यक्ष डॉं. स्वाधिन गाडेकर व इतर नगरसेवक तसेच नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

## कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

### केकत जळगावच्या तरुणाची मुरमा शिवारात गळफास घेऊन आत्महत्या

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**पैठण–** सततच्या नापिकीला आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एका तरुण शेतकऱ्याने लिंबाच्या झाडाला ठिंबक सिंचनच्यानळीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी (दि.३)रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास घटना मुरमा शिवारात उघडकीस आली असून दत्तात्रय मधूकर सोहळे (वय ३६, रा. केकत जळगाव, ता. पैठण) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे नाव आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पैठण तालुक्यातील केकत जळगाव येथील दत्तात्रय मधूकर सोहळे (वय ३६) यांच्याकडे एचएफडीसी बँकेचे शेती वर सुमारे ४ लाख ८० हजार रुपयांचे कर्ज होते, २०१८–१९ मध्ये त्यांनी हे कर्ज उचलले. मात्र , त्यानंतर शेतामध्ये सतत नापिकी व शेतामध्ये कधी कोरडा दुष्काळ कधी तर ओला दुष्काळ पडला. त्यामुळे शेत पिकावर याचा परिणाम झाला, दत्तात्रय सोहळे यांच्या नावे अडीच एकर शेती असून त्या शेतामध्ये कापूस व तूर पिकाची लागवड केली होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून सततच्या नापिकीमुळे त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले होते. बँकेचा कर्जाचा डोंगर सतत वाढत चालला होता.

## प्रभाग १५ मध्ये विकासाची नवी वाटचाल; केडगाव परिसरात डांबरी रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील केडगाव परिसरात भूषण नगर, माधव नगर, जय हिंद नगर, शिवाजीनगर, रभाजी नगर आणि मराठा नगर या भागांमध्ये डांबरी रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. आमदार संग्राम जगताप यांच्या विकास निधीतून या कामास सुरुवात करण्यात आली असून परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या विकासकामासाठी माजी उपमहापौर गीतांजली काळे, स्थायी समिती सदस्या पौर्णिमाताई गव्हाळे तसेच नगरसेवक दत्ताभाऊ गाडळकर आणि सुजय मोहिते यांच्या प्रयत्नांमुळे कामाला गती मिळाली आहे. कार्यक्रमास भाजपा शहराध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक अमोल येवले, विजय पठारे, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, सुनील काळे, लगडसर,वाल्मीक राठोड, दादु साळवे, जगदाळे, विक्रम कचरे, आकाश भागडे, योगेश उघडे, विशाल गीते, प्रमोद अंधारे, गणेश बेल्हेकर, अमित उकिरडे, गणेश पवार, मनोज कराळे, के. डी. जगताप, बाळू डागवाले, दत्ता साळवे, किसन जगताप, भंडारी काका, सुरेश देसाई, अनिल शिंदे, वैशाली देसाई, अश्विनी शिंदे, परीद्या जगताप, वंदना जोशी, अशा घोडके, नीलिमा साळवे, मनीषा जपणे, विद्या शिंदे, सौ. मते, मंदा शिंदे यांच्यासह रभाजीनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ''गेल्या अनेक वर्षांपासून येथील नागरिकांना रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. आता या डांबरीकरणाच्या कामामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिसर झपाट्याने वाढत असून त्या अनुषंगाने विकासालाही वेग देणे आवश्यक आहे. प्रभागातील मूलभूत सुविधांसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''

नुकतेच निवडून आलेल्या चारही नगरसेवकांच्या प्रयत्नांतून प्रभाग क्रमांक १५ मध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामांना गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

प्रभाग क्र. १५ मधील नगरसेवकांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''नागरिकांनी जे प्रश्न मांडले होते आणि आम्ही दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहिलो आहोत. पुढील काळातही परिसरातील विविध समस्या सोडवण्यासाठी आम्ही कृतीबद्ध राहू.''

केडगाव परिसरातील या रस्त्यांच्या कामामुळे वाहतुकीची सोय सुधारून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठी सुधारणा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लगड सर यांनी केले तर आभार दादू साळवे यांनी मानले.

## कामरगांव ते श्री क्षेत्र मढी पायी दिंडीचे माळीवाड्यात स्वागत

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कामरगांव येथील चैतन्य कानिफनाथ सेवा ट्रस्ट आयोजित कामरगांव ते श्री क्षेत्र मढी या पायी दिंडीचे अहिल्यानगर माळीवाडा येथे रासकर बंधू कडून फटाक्यांच्या अतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आले.

दिंडी बरोबर चैतन्य कानिफनाथ सेवा ट्रस्ट चे अध्यक्ष श्री विजय नानाभाऊ जाधव व सचिव श्री मच्छिंद्र लहानू जाधव तसेच कामरगांव, पिंपळगाव कौडा,भोरवाडी,अकोळनेर,चास व पंचक्रोशीतील बहुसंख्य भाविक उपस्थित आहेत. मंडळाचे हे १५ वे वर्ष आहे.

अहिल्यानगरमध्ये दिंडीच्या स्वागतासाठी विजय रासकर, बाळासाहेब खोमणे सर,सुभाष चिंधे



सर,डोंगरे सर,पत्रकार संजय सावंत, अशोकराव भागवत,चाफे फरसाण वाले,आनंद भोसले व भाविक भक्त हजर होते. ढोल,ताशा,लेझीम या पारंपारिक वाद्यांच्या गजरात व नाथनामाच्या जयघोषात दिंडी मढीला प्रस्थान करत आहे.

## श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित ''वारी सज्ञनगडाची'' निमित्त बैठक संपन्न!

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डीतील श्रीराम प्रतिष्ठान आयोजित तिथीनुसार शिवजयंती उत्सव २०२६ यावर्षीही मोठ्या उत्साहात व धुमधडाक्यात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने वारी गड किल्ल्यांची या उपक्रमांतर्गत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एका ऐतिहासिक किल्ल्याची वारी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीराम प्रतिष्ठान श्रीराम तरुण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकीत यंदाची शिवजयंती दि. ६ मार्च २०२६ रोजी साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार यावर्षी शिवभक्तांची वारी ऐतिहासिक किल्ले सज्जनगड येथे आयोजित करण्यात आली आहे. ही वारी ६ मार्च रोजी सायंकाळी ६.०० वाजता निघणार आहे.



दरवर्षी शिवजयंतीनिमित्त किल्ल्यांवर वारी काढून छत्रपतींच्या इतिहासाची आठवण जागविण्याचा आणि तरुण पिढीमध्ये शिवप्रेम जागृत करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.यावर्षी थोडासा बदल करून सज्जनगड किल्ल्याची वारी ही शिवजयंतीच्या दिवशीच सायंकाळी काढण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.वारीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व शिवभक्तांनी आवश्यक कागदपत्रे जमा केली असून ज्यांनी कागदपत्रे जमा केली आहेत त्यांना शिवजयंतीच्या दिवशी ओळखपत्र देण्यात येणार आहे. ओळखपत्र मिळाल्यानंतरच त्यांचा सहभाग अंतिम मानला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली असून याची सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, दि. ४ मार्च रोजी झालेल्या बैठकीत भाजप शहराध्यक्ष रवी तात्या गोंदकर तसेच शिर्डीचे नगरसेवक उपस्थित होते. यावेळी त्यांनी सर्व शिवभक्तांना वारी संदर्भात विविध सूचना देत शिस्तबद्ध व सुरक्षित पद्धतीने वारी पार पाडण्याचे आवाहन केले.याबाबत श्रीराम प्रतिष्ठानचे पदाधिकारी नगरसेवक रवींद्र गोंदकर यांनी माहिती दिलीये.

## फाल्गुन वद्य द्वितीयेनिमित्त जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचा बिज सोहळा संपन्न

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**खरवंडीकासार–** फाल्गुन वद्य द्वितीयेनिमित्त जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचा बिज सोहळा (सदेह वैकुंठगमन )उत्साहात भक्तीमय वातावरणात संपन्न झाला श्रीसंत जनार्धन स्वामी मंदिर खरवंडी कासार या ठिकाणी श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन श्रीसंत जनार्धन स्वामी संस्थाण महंत श्रीहरी पंडीत महाराज यांच्याहस्ते संपन्न झाले श्रीसंत जनार्धन स्वामी समाधी स्थळाची फुलांनी आकर्षक सजावट केली होती आम्ही जातो आपुल्या गावा ,आमचा रामराम घ्यावा या अभंगाने भक्तीमय वातावरण तयार झाले तुकाराम महारांजांनी अभंग रचनेतुन समाज प्रबोधनाचे कार्य केले खरवंडी कासार येथे दर वर्षी तुकाराम महारांजांच्या स्मृतींना या दिवश अभिवादन करण्यात येते आपल्या प्रगल्भ अभंग रचनेतुन सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेंढ रोवणारे ,सामाजिक समता व मानवी कल्याणाचा मार्ग तुकाराम महाराज यांनी यांनी प्रकाशमान केला या स्मृती



दिन बिज सोहळा निमित्त दिवसभर भाविक दर्शनासाठी येत होते महाप्रसाद प्रकाश कटारिया यांच्या वतीने देण्यात आला. श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमा पुजन वेळी निंबादैत्य संस्थान अध्यक्ष डॉ .सुभाष देशमुख चंद्रकांत कटारिया डॉ.अरविंद हुद्देदार देवनाथ फाऊंडेशन प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर दराडे महादेव खेडकर डॉ.आव्हाड प्रदिप जगताप साईनाथ ढोले विठ्ठल शिवगजे तुकाराम अंदुरे रमेश अंदुरे विजय केळगंद्रे सोमनाथ माताडे महादेव जगताप संतोष यमगर वाघ गुरुजी प्रकाश अंदुरे त्रिंबक अंदुरे रेवन ढगे राम राऊत शाम माताडे जोशी देवा अनिल पवार दिलीप देशमुख दत्ता धारकर भगवान जगताप आदि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बलिदान मासानिमित्त अरणगावात रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बलिदान मासानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने अरणगाव (ता. नगर) येथे रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अरणगावातील श्री तुळजाभवानी माता मंदिरात रविवारी सकाळी आठ वाजेपासून या रक्तदान शिबिरास प्रारंभ होणार आहे. अहिल्यानगर ब्लड बँकेच्या सहकार्याने हे शिबिर होणार असून, शिव-शंभू प्रेमींनी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी यशस्वी लढा देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व गलितगात्र झालेल्या हिंदू समाजाला आत्मसन्मान मिळवून दिला. शिवरायांनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी साम्राज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळली. दुर्दैवाने शंभुराजे मोगलांच्या हाती सापडले व धर्मपरिवर्तनासाठी त्यांचा महिनाभर अनन्वित छळ करण्यात आला. परंतु संभाजीराजांनी ताठ मानेने मृत्यूला सामोरे जात धर्मासाठी बलिदान दिले. शंभुराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्वाभिमानासाठी दिलेल्या या बलिदानाची जाणीव सर्वांना राहावी, म्हणून संभाजीराव भिडे गुरुजी प्रणीत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेच्या वतीने फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावास्या या महिनाभराच्या काळात बलिदान मास पाळण्यात येतो. या काळात मुंडण करणे, पायात चप्पल न घालणे, आवडत्या वस्तूचा त्याग करणे, एक वेळ जेवण आदी नियम पाळले जातात.

### ऐतिहासिक ग्रंथ देऊन होणार रक्तदात्यांचा सन्मान

**शिबिरात सहभागी होणा-या प्रत्येक रक्तदात्यास प्रोत्साहनपर भेट म्हणून शिवचरित्रकार बाबासाहेब पुरंदरे यांनी ऐतिहासिक समकालीन पुराव्यानिशी लिहिलेला एक हजार पानांचा ग्रंथ *राजा शिवछत्रपती हे शिवचरित्र तसे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे छायाचित्र देण्यात येणार असल्याची माहिती श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान अरणगाव विभागाच्या वतीने देण्यात आली.**

# कुष्ठधाम येथे कुष्ठरुग्णांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती; अल्पोपहाराचे वाटप

## शिवरायांचे स्वराज्य हे सर्वसामान्यांसाठी होते, समाजातील वंचितांपर्यंत आदर पोहोचवणे हीच खरी शिवजयंती – चंद्रकांत (काका) शेळके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सूर्या फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व शिवसेना सावेडी उपनगर यांच्या वतीने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत कुष्ठधाम येथे कुष्ठरुग्णांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती करण्यात आली व त्यानंतर अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम शिवसेना ओबीसी सेलचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत (काका) शेळके यांच्या पुढाकाराने सिविल हडको परिसरात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाआरती करण्यात आली. विशेष म्हणजे समाजातील वंचित घटकांपर्यंत सन्मान पोहोचावा या हेतूने कुष्ठरुग्णांच्या हस्ते ही आरती करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले. त्यानंतर उपस्थितांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना काका शेळके म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ राजकीय सामर्थ्यावर आधारित नव्हते, तर ते रयतेच्या कल्याणावर उभे होते. समाजातील दुर्बल व वंचित घटकांनाही सन्मानाने जगता यावे, हीच शिवरायांची भूमिका होती. त्यामुळे अशा सामाजिक उपक्रमांद्वारे शिवरायांच्या विचारांचा प्रसार करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

शेळके पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त केवळ मिरवणुका किंवा उत्सव साजरे करण्यापेक्षा समाजासाठी काहीतरी सकारात्मक कार्य करणे अधिक महत्त्वाचे आहे. वंचित, गरजू आणि समाजापासून दूर राहणार्या घटकांपर्यंत प्रेम आणि सन्मान पोहोचवणे हीच खरी शिवभक्ती आहे. समाजात मानवतेची भावना वाढवण्यासाठी प्रत्येकाने अशा उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या उपक्रमास शिवसेना सावेडी उपनगराचे पदाधिकारी, सूर्या फाउंडेशनचे कार्यकर्तेतसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# अहिल्यानगर कापड व्यापारी संघातर्फे नगरसेवकांचा सत्कार

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा नगरसेवकांचा निर्धार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर कापड व्यापारी संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने महानगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. शहरातील ख्रिस्त गल्ली येथील सप्तक हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शाल व झाडाचे रोप देऊन नगरसेवकांचा गौरव करण्यात आला. यावेळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याच्या शुभेच्छा व्यापारी संघटनेतर्फे देण्यात आल्या.

या सत्कार सोहळ्यात नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश घुले, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, मंगलताई लोखंडे, सुरेखाताई कदम, गणेश कवडे, सुभाष लोंढे, आशाताई डागवाले, सुनिता गेनप्पा, शितलताई ढोणे, विपुल शेटीया, संजयजी चोपडा, परेश लोखंडे, किशोर डागवाले आणि संतोष गेनप्पा यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कापड व्यापारी संघाचे अध्यक्ष श्यामसुंदर सारडा होते. यावेळी उपाध्यक्ष सचिन चोपडा, सहउपाध्यक्ष राजेंद्रजी गांधी, सचिव मुकेशजी अरोरा, सहसचिव विजयजी गांधी, खजिनदार धीरज मुनोत यांच्यासह मुकेश अरोरा, सचिन पेटकर, सचिन कटारिया, रजनीकांत गांधी, प्रशांत बोरा, प्रबल पटवा, जितेंद्र लड्ढा, कपिल शहा, विजय गांधी, अक्षय मुनोत, हिम्मत शिंगी, रामेश्वर बलदवा, सतीश सुपेकर आदींसह कापड व्यापारी संघाचे अनेक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष श्यामसुंदर सारडा म्हणाले की, शहराच्या प्रगतीत व्यापारी वर्गाचा मोठा वाटा आहे. शहरातील बाजारपेठा सुस्थितीत राहणे, वाहतूक व्यवस्था सुरळीत असणे तसेच व्यापाऱ्यांच्या समस्या वेळेवर सोडवणे आवश्यक आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांनी व्यापारी वर्गाच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाशी समन्वय साधत सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उपाध्यक्ष सचिन चोपडा यांनी सांगितले की, व्यापारी वर्ग हा शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. व्यापाऱ्यांच्या समस्या, अडचणी आणि सूचनांना प्राधान्य देऊन त्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी संघटना कायम प्रयत्नशील राहील. सर्वांच्या सहकार्याने शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रगत बनविण्याचा प्रयत्न होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांनीही आपल्या मनोगतातून शहराच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. नगरसेवक अविनाश घुले म्हणाले की, ''अहमदनगर कापड व्यापारी संघाने आयोजित केलेला हा सत्कार सोहळा आमच्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारीही देणारा आहे. नागरिकांनी दिलेला कौल हा केवळ विजय नसून शहराच्या विकासाची जबाबदारी आहे. नागरिकांच्या अपेक्षांनुसार काम करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू.''

नगरसेवक बाळासाहेब बोराटे म्हणाले की, शहरातील व्यापारी वर्गाच्या अडचणी, पायाभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था तसेच बाजारपेठेतील नियोजन यांसारख्या प्रश्नांवर प्राधान्याने काम केले जाईल. प्रशासन आणि व्यापारी संघटनांमध्ये समन्वय ठेवून शहराच्या विकासासाठी सकारात्मक निर्णय घेण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.
कार्यक्रमाच्या शेवटी मुकेश अरोरा यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कापड व्यापारी संघातील सर्व व्यापारी बांधवांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात व्यापारी बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

# आशा टॉकीज चौकात सरसेनापती तात्या टोपे मित्र मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## शिवरायांचे कर्तृत्व हे स्वाभिमान आणि सुशासनाचे शाश्वत प्रतीक – महापौर ज्योतीताई गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सरसेनापती तात्या टोपे मित्र मंडळाच्या वतीने आशा टॉकीज चौकात आकर्षक सजावट करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी नगरसेविका सुरेखा कदम, मंगलताई लोखंडे, मनिषा घोलप, स्वाती जाधव, कोतवालीचे पोलिस निरिक्षक संभाजी गायकवाड, तेजश्री थोरात, अण्णा घोलप, डॉ.दर्शन करमाळकर, संतोष गांधी, दत्ता परभणे, शिवा भिंगे, सुनिल तावरे, आकाश भोसले, पियुष तावरे, श्रेयश घोलप, आरव बारसे, रुद्र निस्ताने, बाबु कावरे आदी तसेच मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयंतीनिमित्त चौकात फुलांची सजावट, आणि भगवे ध्वज लावून परिसरात शिवमय वातावरण निर्माण करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. तात्या टोपे मित्र मंडळाच्या वतीने कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे पराक्रम, शौर्य आणि सुशासनाचे अद्वितीय उदाहरण आहे. त्यांनी रयतेच्या हितासाठी उभारलेले स्वराज्य हे लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचे प्रतीक होते. त्यांच्या कार्यातून प्रामाणिकपणा, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा यांचा संदेश समाजाला मिळतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी संभाजी गायकवाड म्हणाले की, शिवाजी महाराजांनी महिलांचा सन्मान, धर्मनिरपेक्षता आणि न्याय या मूल्यांवर आधारित राज्यकारभार उभारला. त्यामुळे त्यांचे विचार आणि आदर्श आजच्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. तरुण पिढीने शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी अण्णा घोलप म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची आठवण करून देत समाजात ऐक्य आणि स्वाभिमानाची भावना जपण्याचे आवाहन केले. शिवरायांच्या कार्यामुळेच स्वराज्याची संकल्पना बळकट झाली आणि सामान्य माणसाला न्याय मिळाला, असे सांगितले.

या कार्यक्रमास तात्या टोपे मित्र मंडळाचे असंख्य कार्यकर्ते, शिवभक्त तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आकर्षक सजावट आणि उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात त्यांना अभिवादन करत स्वराज्य संस्थापकाच्या स्मृतींना उजाळा दिला.

# नाथषष्ठी उत्सवानिमित्त पैठण शहरातील वाहतुकीत मोठा बदल

## जड वाहनांना पर्यायी मार्ग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** संत श्री एकनाथ महाराज यांच्या नाथषष्ठी उत्सवानिमित्त पैठण येथे लाखो भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन शहरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी जड वाहतुकीच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे. हा आदेश छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस प्रशासनाने जारी केला असून ९ मार्च रोजी सकाळी ७ वाजेपासून ते ११ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

नाथषष्ठी सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणात भाविक पैठण येथे दाखल होतात. त्यामुळे पैठणकडे येणाऱ्या मुख्य मार्गांवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने जड मालवाहतूक वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित केले आहेत.

या आदेशानुसार शहागड आपेगाव पैठण छत्रपती संभाजीनगर, तसेच सोलापूर धुळे -५२ मार्गावरील कन्नेर फाटा कापूर पोरगाव चौफुली बिडकीन शेकटा इसारवाडी फाटा छत्रपती संभाजीनगर या मार्गांवरील जड वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. तसेच जालना कन्नेर फाटा पोरगाव चौफुली बिडकीन शेकटा इसारवाडी फाटा मार्गावरील वाहनेही पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहेत.

तसेच छत्रपती संभाजीनगर बिडकीन पैठण मार्गाने येणारी वाहने शेवगावकडे वळवण्यात येणार असून शेवगाव पैठण बिडकीन मार्गावरील वाहने छत्रपती संभाजीनगरकडे पर्यायी मार्गाने सोडण्यात येणार आहेत.

नाथषष्ठी उत्सव काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहनचालकांनी पोलिस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी केले आहे.

(पान १ वरून)

### मोबाईल फुटल्याच्या वादातून प्राणघातक हल्ला

विशाल नावाच्या चालकाने जेसीबी अचानक सुरू केल्याने मोबाईल खाली पडून फुटला. या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला होता; मात्र काही वेळात हा वाद मिटल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, दुपारी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास विशाल हा त्याच्या दहा साथीदारांसह पुन्हा प्लँटमध्ये आला. त्यांनी शाबीर अन्सारी याला गाठून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर दगडाने डोक्यावर व छातीवर वार करत त्याला गंभीर जखमी केले. या हल्ल्यात त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत नमूद करण्यात आला आहे. हल्ला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या फिर्यादी जहागीर अन्सारी यांनाही आरोपींनी मारहाण केल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर सर्व आरोपी तेथून पसार झाले. गंभीर जखमी अवस्थेतील शाबीर अन्सारी याला सहकारी कामगारांनी तातडीने नगरमधील खासगी रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या प्रकरणी जहागीर अन्सारी यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विशालसह ११ जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे पुढील तपास करत आहेत.

### दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा; शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

वीजबिल माफीसाठी २० हजार कोटी शेती उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या पाण्याच्या पंपांचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करण्यासाठी सरकारकडून तब्बल २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. या योजनेमुळे शेती सिंचनाचा खर्च कमी होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.
शेतीला बळ देण्यावर सरकारचा भर अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, शेती आणि ग्रामीण विकास हा राज्याच्या आर्थिक धोरणाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि शेती अधिक शाश्वत बनवणे यासाठी सरकार विविध योजना राबवणार आहे.
एकूणच, कर्जमाफी आणि वीजबिल माफीसारख्या मोठ्या घोषणांमुळे राज्यातील शेतकरी वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न सरकारने या अर्थसंकल्पातून केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ. रणजीत सत्रे,विनोद पुंड,अनिल इवळे,अमोल भांबरकर, बाबासाहेब दळवी, रामदास फुले,ऋषिकेश ताठे संजय भुतकर निलेश सत्रे मनोज ताठे,अक्षय भगत निखिल ताठे, अतुल पडोळे, अनुराग पडोळे,शरद जाधव, स्वप्निल पडोळे,विश्वास शिंदे,महेश शेळके ,प्रशांत ताठे,भाऊसाहेब भगत ,अविनाश ताठे,भाऊसाहेब शिंदे,स्वप्निल मुसळे, सचिन ताठे, प्रदीप ताठे ,योगेश ताठे,शैलेश सत्रे,अरुण शिंदे , आप्पासाहेब पडोळे,आविष भगत,ओंकार भोसले, ऋतिक सुडके, भैय्या बोरुडे, महेश भुजबळ , कान्हा भुतकर, शुभम दळवी,मंगेश ताठे,ओंकार ताठे,सुरज ताठे,आकाश डागवाले ,मोरे पाटील आदी उपस्थित होते.

### नेवासा पोलीस ठाण्याची चौकशी?

महिन्याच्यावर कालावधी उलटून जाऊनही त्याला जेरबंद करण्यास अर्थपूर्ण टाळाटाळ केली जात असल्याने पिडीतेसह तिच्या कुटुंबियांवर आंदोलन, उपोषण सारख्या मार्गांचा अवलंब करण्याची दुर्दैवी वेळ ओढवल्याने पोलीस खात्याच्या अब्रुची लक्तरे एकप्रकारे वेशीला टांगली गेल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.